सत्यमेव जयते

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

क्रमांक-एमआयएस ०६१८/सीआर-६१/२०१८/तीन                    दिनांक ६ ऑक्टोबर, २०२०

**-:प्रसिध्दीपत्रक:-**

**विषय:- राज्यसेवा पूर्व परीक्षा २०२०- परीक्षेच्या आयोजनाबाबत**

शासन सेवेतील विविध संवर्गातील पदभरतीकरीता राज्यातील विभिन्न मागास प्रवर्गातील व्यक्तींना पुरेसे प्रतिनिधित्व मिळावे, या हेतूने राज्य शासनाकडून वेळोवेळी धोरणात्मक निर्णय घेऊन त्यानुसार मागासवर्गीयांकरीता शासन सेवेतील पदे आरक्षित ठेवली जातात. आरक्षणासंदर्भातील शासनाचे त्या त्या वेळीचे धोरण, संबंधित संवर्गातील रिक्त पदसंख्या व भरावयाची पदसंख्या यांस अनुसरुन शासनाकडून बिंदुनामावलीच्या आधारे सामाजिक व समांतर आरक्षण निहाय भरावयाच्या पदांचा आरक्षणनिहाय तपशील आयोगास निवड प्रक्रिया राबविण्याकरीता मागणीपत्राद्वारे उपलब्ध करुन देण्यात येतो. शासनाकडून प्राप्त मागणीपत्र व संबंधित पदांचे सेवा प्रवेश नियम यास अनुसरुन आयोगाकडून संबंधित पदाच्या/पदांच्या भरतीकरीता जाहिरात विज्ञापित करुन निवड प्रक्रिया राबविण्यात येते. सदर कार्यपध्दतीनुसार निवड प्रक्रिया राबवून संबंधित पदावरील नियुक्तीकरीता पात्र उमेदवारांची शासनास शिफारस करण्यात येते.

**२.** राज्यसेवा पूर्व परीक्षा २०२० करीता आयोगाकडून दिनांक २३ डिसेंबर, २०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये शासनाच्या मागणीनुसार विविध सामाजिक प्रवर्ग व समांतर आरक्षणाच्या तपशिलासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी भरण्यात येणा-या पदांची संख्या नमूद करण्यात आली आहे. तसेच, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील उमेदवारांचे सदर प्रवर्गातून अर्जही स्वीकारण्यात आले आहेत. तसेच दिनांक ११ ऑक्टोबर, २०२० रोजी नियोजित पूर्व परीक्षेसाठी प्रवेश प्रमाणपत्रे ही सर्व उमेदवारांस उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणाच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल न्यायालयीन प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ९ सप्टेंबर, २०२० रोजी दिलेल्या अंतरिम आदेशाच्या अनुषंगाने सद्यस्थितीत आयोगामार्फत सुरु असलेल्या विविध संवर्गाच्या निवड प्रक्रियेसंदर्भात उपस्थित होत असलेल्या मुद्द्यांच्या संदर्भात आयोगाकडून दिनांक १६ सप्टेंबर, २०२० रोजीच्या पत्राद्वारे शासनाकडे विचारणा करण्यात आली आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशाच्या अनुषंगाने सदर मुद्द्यांच्या संदर्भात शासनाकडून घेण्यात येणा-या धोरणात्मक निर्णयानुसारच आयोगाकडून निवड प्रक्रियेसंदर्भातील पुढील कार्यवाही करण्यात येईल व राज्यसेवा पूर्व परीक्षा २०२० तसेच आयोगाकडून सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाकरीता आरक्षित पदसंख्या दर्शविलेली इतर कोणतीही परीक्षा/निवड प्रक्रिया यांचे निकाल जाहीर करण्यात येणार आहेत.

सहसचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग